खर्डा संसदेतील ठराव दि. २८/०५/२०१४

१) दलित, आदिवासी, भटके विमुक्त व अल्पसंख्याक यांच्या वरील होणारे अन्याय अत्याचार रोखण्यास महाराष्ट्र शासन अपयशी ठरले आहे, म्हणून ही 'खर्डा संसद' राज्य शासनाचा निषेध करते.

२) जातीय अत्याचार प्रतिबंधक सुधारणा अध्यादेश २०१४, नव्या संसदेने त्वरित मंजूर करुण अध्यादेशास नियमित करावे.

३) जातीय अत्याचार प्रतिबंधक सुधारणा अध्यादेशानुसार विशेष न्यायालयाची स्थापना प्रत्येक जिल्हात त्वरित करावी.

४) जातीय अत्याचार प्रतिबंधक सुधारणा अध्यादेशानुसार दाखल होणारे खटले त्वरीत निकाली काढण्यासाठी प्रत्येक जिल्हात विशेष सरकारी वकिलांचा पॅनलची नेमणुक करण्यात यावी.

५) घटनाबाह्य असलेली महात्मा गांधी तंटामुक्त समिती बरखास्त करावी.

६) जातीय अत्याचार पिडीत कुटुंबाचे पुर्नवसन व त्यांच्यासाठी नोकरी व घरकुलाची अमलबजावणी तातडीने करण्यात यावी.

७) महाराष्ट्रातील जातीय अत्याचार प्रकरणाची व त्यांच्या व खटल्यांच्या परिस्थितीची श्वेत पत्रिका १ महिन्यात प्रसिद्ध करावी.

८) जातिय अत्याचाराच्या बळी ठरलेल्या स्त्रियांची पुर्नवसन व नोकरी बाबत विशेष तरतुद करावी.

९) महाराष्ट्र विधीमंडळाच्या आगामी पावसाळी अधिवेशनात जातीय अत्याचारा विषयी चर्चेसाठी एक दिवस राखीव ठेवुन त्याबाबत सर्वोतोपरी चर्चा घडवून आणावी.

१०) दलित, आदिवासी व भटक्या विमुक्त कास्तकारांचे गायरान जमिनीवरील २०१० पर्यंतचे हक्क नियमित करावे.

११) अनु. जाती विशेष घटक योजना व आदिवासी उपयोजना यांचा अनुशेष त्वरीत भरून काढावा.

१२) अनु. जाती विशेष घटक योजना व आदिवासी उपयोजना यांची कठोरपणे अमलबजावणी होण्यासाठी कर्नाटक राज्याच्या धर्तीवर स्वतंत्र कायदा आगामी पावसाळी अधिवेशनात मंजूर करावे.

१३) भटक्या विमुक्तांसाठी बजेटची विशेष तरतूद करण्यात यावी.

१४) महाराष्ट्रातील आदिवासींच्या जमिनींचे बिगर आदिवासी व खाजगी कंपन्यांकडे होणारे बेकायदेशीर हस्तांतर त्वरीत थांबवावे व पूर्वलक्षीय प्रभावाने त्यांच्या जमिनी परत कराव्यात.

१५) पेसा कायद्याची महाराष्ट्रात कडक अमलबजावणी करावी.

१६) महाराष्ट्रातील तुरुंगात घडणाऱ्या अत्याचार व मृत्यूचे प्रमाण मोठे असून त्यात मोठ्या प्रमाणात भटके, आदिवासी, दलित व अल्पसंख्याक बळी पडतात. यावर प्रतिबंधात्मक उपाय करण्यात यावे व याविषयीचा स्वतंत्र कायदा संमत करावा.

१७) जाती धर्माच्या खोट्या प्रतिष्ठेसाठी तरुण तरुणींचा बळी घेणाऱ्या ऑनर किलिंग सारख्या घटनांना प्रतिबंध घालण्यासाठी स्वतंत्र कायदा संमत करावा.

१८) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जातीसंस्थेचे निर्मूलन या ग्रंथाला ८५ वर्षे पूर्ण झाली आहेत. त्यानिमित्ताने जातीय अत्याचाराच्या व

# Dalit Adivasi Adhikar Andolan (DA3)

धर्मनिरपेक्षतेच्या विचाराचा समाजामध्ये खोलवर प्रचार व प्रसार होण्यासाठी शैक्षणिक अभ्यास क्रमामध्ये ~~या विचाराचा व्यापक प्रमाणात~~ समाविष्ट करण्यात यावा.

वृंदा करात
कॉ. ब्रिंदा करात

मा. भाई वैद्य

डॉ. नितीश नवसागरे

कॉ. सुबोध मोरे

कॉ. कुमार शिराळकर

कॉ. किरण मोघे

ॲड. अरुण जाधव

डॉ. संजय दाभाडे

मंगल खिंवसरा

मा. विलास वाघ

कॉ. मिलिंद सहस्त्रबुद्धे

मा. वसंत साळवे

अशोक तांगडे

सुनिता भोसले

मनिषा तोकले

कबीर कांबळे

युवराज सोनवणे

सुनिल दुधे

प्रियदर्शी तेलंग 28/05/14

बापु ओव्हाळ

बेला भाटिया

सुशीला मोरे.

Priyadarshi Telang, Manuski Center, Deccan College Road, Yerwada, Pune – 06 | www.da3.in | 9673313177